# प्रसिध्दी पत्रक

## शासकीय रेखाकला परीक्षा – २०१८ चे निकाल जाहीर

महाराष्ट्र राज्यातील कला संचालनालयातर्फे सप्टेंबर, २०१८ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय एलिमेंटरी व इंटरमिजिएट रेखाकला परीक्षांचे निकाल संबंधित केंद्रावर आज दिनांक १४ जानेवारी, २०१९ रोजी जाहीर झाले.

या परीक्षा प्रामुख्याने माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी असून त्या अखिल भारतीय स्तरावर महाराष्ट्र, गोवा, मध्य प्रदेश व उत्तर प्रदेश या राज्यातून एकूण १११६ केंद्रांमार्फत आयोजित करण्यात आल्या होत्या.

एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षांमध्ये २०१८ या वर्षी एकूण ६,७१,२५६ विद्यार्थ्यांची नावे नोंदविलेली होती. त्यापैकी परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या व उत्तीर्ण विद्यार्थ्यांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| परीक्षेचे नाव | परीक्षेस नोंदविलेली विद्यार्थ्यांची संख्या | प्रत्यक्ष परीक्षेस प्रविष्ठ झालेले | उत्तीर्ण संख्या | | | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | “ए” श्रेणी | “बी” श्रेणी | “सी” श्रेणी | | |
| एलिमेंटरी | ३,९६,९४९ | ३,७१,६१४ | १७,६९४ | ५६,२३९ | २,६७,९६० | ३,४१,८९३ | ९२.०२% |
| इंटरमिजिएट | २,७४,३०७ | २,६०,९३४ | १४,८९४ | ३९,५५० | १,७५,७३१ | २,३०,१७५ | ८८.२१% |

परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांपैकी उत्तीर्ण उमेदवारांची टक्केवारी एलिमेंटरी ९२.०२% व इंटरमिजिएट ८८.२१% इतकी आहे.

एलिमेंटरी परीक्षेत केंद्र क्रमांक १३१०१३, बैठक क्रमांक १७२, कु.ओंकार केशव भताने हा विद्यार्थी श्री रत्नेश्वर विद्यालय, तालुका परळी, जिल्हा बीड या केंद्रामधून व इंरमिजिएट परीक्षेत केंद्र क्रमांक १०७०४५, बैठक क्रमांक ६१, कु.गवळी पुर्वा विजयकुमार ही विद्यार्थीनी एच.एच.सी.पी.हायस्कुल फॉर गर्ल्स, हुजूरा पागा, पुणे या केंद्रावरुन राज्य स्तरावर प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेले आहेत.

शासकीय तसेच खाजगी देणगीदारांनी जाहीर केलेली बक्षिसे पात्र विद्यार्थ्यांना जाहीर करण्यात आली असून बक्षिसपात्र उमेदवारांची यादी www.doa.org.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

--------------------------------------X----------------------------------